जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र ९८१९२०८२७९

प्रेसनोट दिनांक २१.०१.२०२५

## ‘‘आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी असलेल्या व्हेल माशाची वांती/उलटी (Ambergris) विक्री करीता आलेल्या आरोपीस शिताफीने अटक ’’

दिनांक.२०/०१/२०२४ रोजी १८:३५ वा. गुन्हे शाखा, घटक–१, ठाणे येथील पोउपनि/दिपक घुगे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखा, घटक–१, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली साकेत कॉम्प्लेक्स कडुन क्रिक नाक्याकडे येणाऱ्या रोडवर, राबोडी, ठाणे याठिकाणी सापळा कारवाई दरम्यान इसम नामे नितीन मुत्तना मोरेलु, राह.ठी पुणे याच्या ताब्यात ०५ किलो ४८ ग्रॅम वजनाची व्हेल माशाची वांती/उलटी (Ambergris) लहान मोठे आकाराचे लाल रंगाचे तुकडे मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत अधिक चौकशी केली असता नमुद इसमाच्या ताब्यात मिळून आलेली व्हेल माशाच्या वांती/उलटीस आंतरराष्ट्रीय काळया बाजारात चांगली मागणी असून नमुद उलटी पासुन उच्च दर्जाचे अत्तर, सुगंधित द्रव्ये तयार करण्यासाठी वापर केला जातो. त्याची अंदाजे किंमत ५ कोटी रूपये असून नमुद आरोपी याच्या ताब्यात मिळून आलेली व्हेल माशाची वांती/उलटी त्याने कोणाकडुन व कोणास विक्री करीता आणली याबाबत गुन्हे शाखा युनिट १, ठाणे हे करीत आहेत.

सदर प्रकरणी आरोपी विरूध्द राबोडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं ४५/२०२५ वन्य प्राणी संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ३९, ४४, ४८, ४९बी, ५७, ५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे, श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध–१, गुन्हे शाखा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/सचिन गायकवाड, सपोनि/अब्दुल मलिक, ग्रेड पोउपनिरी/रविंद्र पाटील, सपोउपनिरी/नरसिंग महापुरे, सपोउपनिरी/दयानंद नाईक, पोहवा/४८१७ प्रशांत निकुंभ, पोना/७३७५ बडगुजर, चापोहवा/३८१ शशिकांत सावंत, सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक–१, ठाणे, यांच्या पथकाने केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर